Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

कला-संस्कृतीच्या विकासासाठी शासन कटिबद्ध (पान २ वर)



। शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६। वर्ष १ ।अंक १९२ ।पाने ४। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

महाराष्ट्रात रासायनिक उद्योगांसाठी स्वतंत्र धोरण!

मुंबई । रासायनिक उद्योगातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र रासायनिक उद्योग धोरण तयार करीत असून, हे धोरण नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार आहे. वाढत्या औद्योगिक गरजा, गुंतवणुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि उद्योगस्नेही वातावरण यांचा विचार करून हे धोरण तयार करण्यात येत असून पालघर जिल्ह्यात वाढवण बंदराच्या परिसरात मोठे रासायनिक उद्योग केंद्र विकसित करण्याचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील सुमारे 3,600 उद्योग रासायनिक क्षेत्रात कार्यरत आहेत. देशाच्या रासायनिक उद्योगातील एकूण स्थूल मूल्यवर्धनात महाराष्ट्राचा सुमारे 19 टक्के, तर रासायनिक उत्पादनांच्या निर्यातीत सुमारे 17 टक्के वाटा आहे.

जरांगेंच्या ५०० कोटींच्या कथित आरोपांनी राजकारण तापले; शिंदे गट थेट फडणवीसांच्या भेटीला

ऑडिओ क्लिपचा बॉम्ब! राजकीय वातावरण तापले!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे क्लिपच्या सखोल चौकशीची मागणी

जन सम्राट टाईम्स

मुंबई | मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ऑडिओ क्लिपमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या क्लिपमध्ये ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहारासह गंभीर आरोप करण्यात आल्याचा दावा केला जात आहे.

या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने हे आरोप फेटाळून लावत क्लिपची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. याच पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे वरिष्ठ नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली आहे.कथित ऑडिओ क्लिपमधील आरोपांची सत्यता, त्यामागील पार्श्वभूमी आणि संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, या क्लिपमधील दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसल्याने चौकशीतूनच वस्तुस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, कथित ऑडिओ क्लिपमध्ये एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे यांच्यासाठी भाजपकडून ५०० कोटी रुपये घेतल्याचा आरोप करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. तसेच, हा कथित पैसा खासदार श्रीकांत शिंदे यांच्या



माध्यमातून देण्यात आल्याचा दावाही क्लिपमध्ये असल्याचे वृत्त आहे. या आरोपांमुळे सत्ताधारी महायुतीतील राजकीय समीकरणांबाबत चर्चांना उधाण आले आहे. शिंदे गटाने हे आरोप स्पष्टपणे फेटाळून लावले असून, केवळ कथित ऑडिओ क्लिपच्या आधारे निष्कर्ष काढू नयेत, अशी भूमिका घेतली आहे. क्लिपची सत्यता तपासून संबंधित प्रकरणाचा निष्पक्ष तपास करण्यात यावा, अशी मागणी पक्षाकडून केली जाणार आहे. त्यासाठी शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणावर शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील यांनी कथित क्लिपच्या संदर्भात फॉरेन्सिक लॅबकडे तक्रार करून तिची सत्यता तपासून घ्यावी, असे म्हटले. तक्रार आणि चौकशीची मागणी झाल्यास राज्य सरकारने या प्रकरणाची तपासणी करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कोणाला कोणाविरोधात लढायला सांगण्याचा नाही, असे सांगत म्हस्के यांनी जरांगे यांच्याबद्दल आपण कायम आदर बाळगल्याचे नमूद केले. मात्र, एकनाथ शिंदे यांच्यावर कोणी आरोप केले किंवा टीका केली, तर त्याला प्रत्युत्तर देणारच, अशी आक्रमक भूमिका त्यांनी मांडली. त्यामुळे या प्रकरणात शिंदे गटाने राजकीय पातळीवर आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, भाजप नेते नितेश राणे यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून जरांगे पाटील यांच्यावर टीका केली. कोणीतरी काही सांगितले किंवा एका व्यक्तीकडून पैसे घेऊन दुसऱ्याला दिल्याचा दावा केला, म्हणजे तो पुरावा ठरत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अशा प्रकारच्या चर्चा राजकीय वर्तुळात होत असतात; मात्र केवळ ऐकीव माहितीवरून आरोप करणे योग्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांच्यावर कठोर शब्दांत टीकाही केली.

चौकशीतूनच सत्य समोर येणार

या कथित ऑडिओ क्लिपमुळे शिंदे गट, भाजप आणि मनोज जरांगे पाटील यांच्यातील राजकीय संघर्षाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत होणाऱ्या प्रस्तावित भेटीत शिंदे गटाकडून कोणती भूमिका मांडली जाते आणि चौकशीबाबत सरकार काय निर्णय घेते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मात्र, ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहारासह क्लिपमधील आरोप अद्याप स्वतंत्रपणे सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे क्लिपची फॉरेन्सिक तपासणी, संबंधितांचे म्हणणे आणि अधिकृत चौकशी यांनाच या प्रकरणात निर्णायक महत्त्व राहणार आहे.

पक्षाच्या हकालपट्टीनंतर नितेश कराळे भावुक; 'ज्यांनी माझा गेम केला, त्यांना उघडं करणार!'

जन सम्राट टाईम्स

नागपूर । प्रतिनिधी: राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आल्यानंतर नागपूर पदवीधर मतदारसंघातील अपक्ष उमेदवार नितेश कराळे भावुक झाले आहेत. पक्षाच्या कारवाईनंतर त्यांना अश्रू अनावर झाल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अनेक वर्षे पक्षासाठी काम केले, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलने केली, प्रसंगी तुरुंगवासही भोगला; मात्र पक्षाने आपल्या कामाची दखल घेतली नाही, अशी खंत कराळे यांनी व्यक्त केली. तसेच, आपल्याविरोधात राजकीय खेळी करणाऱ्यांना उघड करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत नितेश कराळे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करून ती कायम ठेवल्याने महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारासमोर आव्हान निर्माण झाले होते. पक्षाच्या भूमिकेविरोधात उमेदवारी कायम ठेवल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने त्यांच्यावर सहा वर्षांच्या हकालपट्टीची कारवाई केली. या निर्णयानंतर कराळे यांनी आपली नाराजी व्यक्त करत पक्षासाठी केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. 'माझ्या कुटुंबाचीही विचारपूस केली नाही' पक्षाच्या कारवाईनंतर मनातील भावना व्यक्त करताना कराळे म्हणाले की, आपण पक्षासाठी अनेक आंदोलने केली, तुरुंगवास भोगला आणि आपल्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हाही दाखल झाला. या काळात पक्षातील कोणत्याही पदाधिकाऱ्याने फोन करून आपली विचारपूस केली नाही, अशी त्यांची तक्रार



आहे. एवढेच नव्हे, तर आपल्या पत्नीशीही कोणी संपर्क साधला नाही, असे त्यांनी सांगितले. "माझा मुलगा मला बाबा कुठे गेले, असे विचारायचा. मी माझ्या भावना कुठे व्यक्त करायच्या? पक्षासाठी एवढे काम करूनही माझ्याशी अशा प्रकारे वागले जाणे दुर्दैवी आहे," अशा शब्दांत त्यांनी आपली व्यथा मांडली. या वक्तव्यादरम्यान कराळे भावुक झाल्याचे व्हिडिओमध्ये दिसत असल्याचा दावा केला जात आहे. 'पक्षासाठी क्लासकडेही दुर्लक्ष केले' नितेश कराळे यांनी पक्षासाठी काम करताना आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याकडे दुर्लक्ष झाल्याचेही सांगितले. विद्यार्थ्यांना शिकविण्याचा आपला क्लास सांभाळण्याऐवजी पक्षाचे काम आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलने यांना प्राधान्य दिले. त्यामुळे क्लासमधील विद्यार्थ्यांची संख्याही कमी झाल्याचे त्यांनी नमूद केले. "पक्षासाठी इतका वेळ दिल्यानंतर माझ्याबाबत असा निर्णय घेतला जातो, याला मी महाविकास आघाडीने दिलेला पुरस्कार समजतो," अशी उपरोधिक प्रतिक्रिया कराळे यांनी व्यक्त केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे पक्षांतर्गत नाराजी आणि उमेदवारीवरून निर्माण झालेला वाद पुन्हा चर्चेत आला आहे. 'मतदार मतदानातून उत्तर देतील' आपण एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा असून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी लढलो, आंदोलने केली आणि त्यांचे प्रश्न मांडले, असे कराळे यांनी सांगितले. आपल्या कामाची मतदार दखल घेतील आणि मतदानातून उत्तर देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मतमोजणीच्या दिवशी आपल्या उमेदवारीचे राजकीय परिणाम स्पष्ट होतील, असे सांगतानाच पक्षाने केलेल्या कारवाईला आपण स्पष्टीकरणासह उत्तर देणार असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच, "ज्या लोकांनी माझा गेम केला आहे, त्या व्यक्तींना मी उघडकीस आणेन," असा इशाराही त्यांनी दिला. निवडणुकीतील संघर्षाला नवे वळण? नितेश कराळे यांच्या हकालपट्टीनंतर नागपूर पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीचा राजकीय संघर्ष अधिक चर्चेत आला आहे. एका बाजूला पक्षशिस्तीचा मुद्दा, तर दुसऱ्या बाजूला पक्षासाठी केलेल्या कामाची दखल घेतली नसल्याची कराळे यांची नाराजी, यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. आता मतदार त्यांच्या अपक्ष उमेदवारीला कितपत प्रतिसाद देतात आणि या घडामोडींचा निवडणुकीवर काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले .

देशात गडबड करणारा माईचा लाल अजून जन्माला यायचा आहे

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: देशात येत्या चार ते पाच महिन्यांत मोठी गडबड होण्याची शक्यता असून, एक वेळ अशी येईल की देशाला पंतप्रधानही नसेल, असे वक्तव्य महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या या विधानावर राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रत्युत्तर दिले. "देशात गडबड करणारा माईचा लाल अजून जन्माला यायचा आहे. हे नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे. कोणी गडबड केली, तर आम्ही सरळ पाकिस्तानात जाऊन ठोकतो," अशा शब्दांत पाटील यांनी राज ठाकरे यांना टोला लगावला. एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी ही भूमिका मांडल्याचे वृत्त आहे. राज ठाकरे यांनी देशातील राजकीय परिस्थिती, ईव्हीएमवर होणाऱ्या निवडणुका आणि आगामी काळातील संभाव्य घडामोडींविषयी भाष्य केले होते. त्यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले. याच पार्श्वभूमीवर गुलाबराव पाटील यांनी आपल्या शैलीत प्रत्युत्तर देत केंद्र सरकारच्या नेतृत्वाचा उल्लेख केला. 'मोदी सरकारमध्ये देशात गडबड होऊ देणार नाही' राज ठाकरे यांनी पुढील चार ते पाच महिन्यांत देशात मोठी उलथापालथ होऊ शकते, असे संकेत दिल्याचे सांगितले जाते. देशातील जनतेचा



सरकारविरोधातील रोष वाढत असल्याचा दावाही त्यांनी केल्याचे वृत्त आहे. यावर प्रतिक्रिया देताना गुलाबराव पाटील यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचा उल्लेख करत देशातील परिस्थिती नियंत्रणात असल्याचा विश्वास व्यक्त केला. "देशात गडबड करणारा माईचा लाल अजून जन्माला यायचा आहे," असे म्हणत त्यांनी राज ठाकरे यांच्या विधानावर टीका केली. तसेच देशाच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करत पाकिस्तानचा संदर्भ दिला. पाटील यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांची चर्चा पुन्हा रंगण्याची शक्यता आहे. ईव्हीएमवरून राज ठाकरेंची भूमिका राज ठाकरे यांनी निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या (ईव्हीएम) वापराबाबतही प्रश्न उपस्थित केल्याचे वृत्त आहे. जगातील अनेक देशांमध्ये मतदानासाठी वेगवेगळ्या पद्धती वापरल्या जात असताना भारतात ईव्हीएमचा वापर का केला जातो, असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. निवडणुका मतपत्रिकेवर घेण्याची मागणीही त्यांनी केली. देशातील राजकीय परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करताना आगामी काळात जनतेचा असंतोष रस्त्यावर उतरू शकतो, असेही राज ठाकरे यांनी म्हटल्याचे सांगितले जाते. त्यांच्या या विधानावर गुलाबराव पाटील यांनी दिलेले उत्तर सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

वर्दीआडून काळ्याधंद्याचा उद्योग!

मुंबई : दुसऱ्या राज्यांत जाऊन कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज जप्त केल्याचा गवगवा करणाऱ्या मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या स्वतःच्याच हद्दीत मात्र 'दिव्याखाली अंधार' असल्याचे संतापजनक वास्तव पुन्हा उघडे पडले आहेपोलिस हवालदार प्रकाश पवार याला त्याचा साथीदार अखिलेश कुमार याच्यासह थेट एमडी इग्जची तस्करी करताना रंगेहाथ बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.खाकी वर्दीतले रक्षकच थेट ड्रग्ज माफियांचे भागीदार बनल्याने पोलिस दलाची लक्तरे वेशीवर टांगली गेली असून, सामाजिक कार्यकर्ते सुशांत पवार यांनी पोलीस आयुक्तांना चांगलेच खडे बोल सुनावले आहेत.

जलप्रकल्पांबाबत मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय?

जन सम्राट टाईम्स



मुंबई| प्रतिनिधी: जलप्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता आणि दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्पांसाठी आवश्यक जमीन, मार्गाधिकार व अन्य परवानग्या आधीच उपलब्ध असणे, तसेच वीज खर्च कमी करण्यासाठी सौरऊर्जा व बॅटरी साठवणुकीसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करणारे ग्राहक निश्चित करून या प्रकल्पांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचित केले. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाच्या (आयएफसी) शिष्टमंडळासोबत मुख्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थानी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा व जलप्रकल्पांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. या बैठकीत प्रकल्पांची अंमलबजावणी, वित्तपुरवठा, तांत्रिक उपाययोजना आणि निर्धारित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करण्याबाबत चर्चा करण्यात आली.जागतिक बँकेच्या शिष्टमंडळात दक्षिण आशिया प्रादेशिक संचालक मारा वॉर्विक, भारतासाठी जलक्षेत्र व्यवस्थापक विल्यम रेक्स, आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाचे (आयएफसी) दक्षिण आशिया विभागातील पायाभूत सुविधा क्षेत्राचे व्यवस्थापक नुरू लामा, तसेच हर्ष गोयल, नीरज गुप्ता, ललिता श्रीनिवास यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की जागतिक बँकेसोबतचे संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम कार्यप्रणाली आणि भविष्यातील पिढ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यवस्था विकसित करण्यामध्ये जागतिक बँकेचे योगदान महत्वपूर्ण आहे. यापूर्वीही राज्याने जागतिक बँकेसोबत विविध क्षेत्रांत काम केले असून, यापुढेही हे सहकार्य अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे.प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंब टाळण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध असणे, मार्गाधिकार निश्चित असणे आणि सर्व संबंधित परवानग्या प्राप्त झालेल्या असणे महत्वाचे आहे. अनेकदा प्रकल्प मंजूर झाल्यानंतर जमीन उपलब्ध नसल्याने किंवा अन्य अडचणींमुळे काम सुरू होण्यास एक ते दोन वर्षांचा विलंब होतो. त्यामुळे वित्तपुरवठ्यासाठी निवडण्यात येणारे प्रकल्प प्रत्यक्ष गुंतवणुकीसाठी पूर्णपणे तयार असावेत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. लहान शहरांमध्येही अशा पायाभूत सुविधांची मोठी गरज आहे. उपलब्ध संसाधनांचा एकत्रित वापर करून आणि विविध संस्थांमध्ये समन्वय साधून प्रकल्पांची अंमलबजावणी केल्यास वित्तपुरवठ्याचा खर्च कमी करता येईल. त्यामुळे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि दीर्घकाळ टिकणारे ठरतील, असेही त्यांनी नमूद केले.जलप्रकल्पांच्या दैनंदिन संचालनामध्ये वीज खर्च हा महत्त्वाचा घटक आहे. अनेक प्रकल्पांमध्ये तांत्रिक त्रुटींमुळे नव्हे, तर वीजबिलांचा खर्च परवडत नसल्यामुळे कामकाजात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन प्रकल्पांच्या नियोजनाच्या टप्प्यापासूनच त्यांच्या संचालन खर्चाचा विचार करणे आवश्यक आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

राज्यातील शाळांना 13 दिवसांची दिवाळी सुट्टी; 16 नोव्हेंबरपासून दुसरे सत्र सुरू!

२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान सुट्ट्यांचे नियोजन; शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांना दिलासा

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या सुट्ट्यांबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये दिवाळीनिमित्त २ ते १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत १३ दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या सुट्ट्यांनंतर सोमवार, १६ नोव्हेंबरपासून शाळांमध्ये नियमित वर्ग सुरू होणार असून, दुसऱ्या शैक्षणिक सत्राला प्रारंभ होईल. दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर सुट्ट्यांचे वेळापत्रक आधीच निश्चित झाल्यामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना सणासुदीचे नियोजन करणे सोयीचे होणार आहे. कुटुंबासोबत प्रवास, नातेवाइकांच्या भेटी आणि सणांची तयारी यासाठीही या सुट्ट्यांचा उपयोग करता येणार आहे. पहिले सत्र ३१ ऑक्टोबरला संपणार शिक्षण विभागाच्या नियोजनानुसार, शैक्षणिक वर्षाचे पहिले सत्र १५ जून ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पूर्ण होणार आहे. त्यानंतर दिवाळीच्या सुट्ट्या लागू होतील. सुट्ट्या संपल्यानंतर १६ नोव्हेंबर २०२६ पासून दुसऱ्या सत्रातील अध्यापन सुरू होईल.

दुसरे सत्र १६ नोव्हेंबर २०२६ ते १ मे २०२७ या कालावधीत चालणार असल्याचे वेळापत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर ३ मे ते १४ जून २०२७ या कालावधीत विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी मिळणार आहे. दिवाळीच्या



सणांसाठी विद्यार्थ्यांना वेळ दिवाळी हा विद्यार्थ्यांसह सर्वच कुटुंबांसाठी आनंदाचा आणि उत्साहाचा सण आहे.

या काळात घराची साफसफाई, फराळाची तयारी, पूजाविधी आणि नातेवाइकांच्या भेटीगाठी यांची लगबग सुरू असते. सुट्ट्यांचे वेळापत्रक निश्चित झाल्याने पालकांना प्रवासाचे आरक्षण, गावाकडे जाण्याचे नियोजन आणि कौटुंबिक कार्यक्रमांची आखणी आधीच करता येणार आहे.

दिवाळीच्या कालावधीत धनत्रयोदशी, दिवाळी पाडवा, बलीप्रतिपदा आणि भाऊबीज यांसारख्या सणांचा समावेश असल्याने विद्यार्थ्यांना कुटुंबीयांसोबत सण साजरे करण्यासाठी वेळ मिळणार आहे. सुट्ट्यांच्या वेळापत्रकात मनमानी बदल नको शाळांच्या दिवाळी सुट्ट्यांच्या नियोजनाबाबत शाळा व्यवस्थापनाने स्वतःहून किंवा मनमानी पद्धतीने बदल करू नयेत, अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्याचे सांगण्यात आले आहे. स्थानिक पातळीवरील सण किंवा अपरिहार्य कारणामुळे सुट्ट्यांच्या तारखांमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्यास संबंधित शाळांनी शिक्षण विभागाची रीतसर पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे शाळांनी अधिकृत वेळापत्रकानुसार नियोजन करणे अपेक्षित आहे. पालकांनीही आपल्या मुलांच्या शाळेकडून मिळणाऱ्या अधिकृत सूचनांची खात्री करून घ्यावी. दुसऱ्या सत्रासाठीही नियोजन महत्त्वाचे दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर दुसरे सत्र सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांनी सुट्टीचा आनंद घेतानाच पुढील अभ्यासाचे नियोजन करणे आवश्यक आहे. सुट्ट्यांमध्ये विश्रांती, वाचन आणि मागील अभ्यासाची उजळणी यासाठी वेळ दिल्यास नव्या सत्राची सुरुवात अधिक चांगल्या पद्धतीने करता येईल. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या सुट्ट्यांबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.दिवाळीनिमित्त २ ते १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत १३ दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. १६ नोव्हेंबरपासून शाळांमध्ये नियमित वर्ग सुरू होणार असून, दुसऱ्या शैक्षणिक सत्राला प्रारंभ होईल.

12 जागांसाठी निवडणुकीचा रंग चढला

प्रचाराला येणार वेग, जिल्हा बँकेच्या २८ उमेदवारांना चिन्हवाटप

जन सम्राट टाईम्स

सातारा । प्रतिनिधी : सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतील १२ जागांसाठी रिंगणात असलेल्या २८ उमेदवारांना जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी संजय सुद्रिक यांनी निवडणूक चिन्हांचे वाटप केले. चिन्हवाटपानंतर अंतिम उमेदवार यादीसह चिन्हे जिल्हा बँकेच्या प्रसिद्धी फलकावर प्रदर्शित करण्यात आली. त्यामुळे निवडणुकीतील प्रचाराला आता वेग येणार असून, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची धावपळ वाढणार आहे.प्राथमिक कृषी पतपुरवठा विकास सेवा सोसायटीच्या मतदारसंघांत जावळीतील विठ्ठल गोळे यांना छताचा पंखा, ज्ञानदेव रांजणे यांना ट्रॅक्टर, महाबळेश्वरमधील संजय मोरे यांना प्रेशर कुकर, तर रूपाली राजपुरे यांना टेबल चिन्ह मिळाले. कराडमधील उदयसिंह पाटील यांना हिरा, धनंजय पाटील यांना अंगठी, पाटणमधील शंभूराज देसाई यांना कपाट, तर सत्यजित पाटणकर यांना ऑटोरिक्षा देण्यात आली. कोरेगावमध्ये सुनील खत्री यांना कपबशी, तर सुनील माने यांना स्कूटर चिन्ह मिळाले.माण मतदारसंघात ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांना फुटबॉल, शेखर गोरे यांना कॅरम बोर्ड, तर मनोज पोळ यांना चष्मा चिन्ह देण्यात आले. खंडाळ्यात अजय भोसले यांना खटारा, शामराव गाढवे यांना चालण्याची काठी, तर संजीव गाढवे यांना मोबाईल चिन्ह मिळाले. फलटणमध्ये समशेर नाईक निंबाळकर यांना हेलिकॉप्टर, तर संजीवराजे नाईक निंबाळकर यांना सुटकेस चिन्ह देण्यात आले. अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गात सत्यवान कांबळे यांना बस, सुरेश गायकवाड यांना टॅक्सी, दीपक चव्हाण यांना छत्री, तर रवींद्र बडेकर यांना लिफाफा चिन्ह मिळाले. इतर मागास प्रवर्गात संदीप पाचांगणे यांना बॅट, तर योगेश फडतरे यांना छत्री देण्यात आली. विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गात अर्जुन काळे यांना बशी, तर सुनील वाघ यांना



किटली चिन्ह मिळाले. चिन्हवाटपामुळे उमेदवारांना प्रचाराची दिशा स्पष्ट झाली आहे. आगामी दिवसांत चिन्हांची ओळख मतदारांपर्यंत पोहोचवणे, स्थानिक समीकरणे जुळवणे आणि मतदारांचा पाठिंबा मिळवणे, यासाठी चुरस वाढण्याची शक्यता आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतील १२ जागांसाठी रिंगणात असलेल्या २८ उमेदवारांना जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी संजय सुद्रिक यांनी निवडणूक चिन्हांचे वाटप केले. चिन्हवाटपानंतर अंतिम उमेदवार यादीसह चिन्हे जिल्हा बँकेच्या प्रसिद्धी फलकावर प्रदर्शित करण्यात आली. त्यामुळे निवडणुकीतील प्रचाराला आता वेग येणार असून, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची धावपळ वाढणार आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा विकास सेवा सोसायटीच्या मतदारसंघांत जावळीतील विठ्ठल गोळे यांना छताचा पंखा तर रूपाली राजपुरे यांना टेबल चिन्ह मिळाले. कराडमधील उदयसिंह पाटील यांना हिरा, धनंजय पाटील यांना अंगठी, पाटणमधील शंभूराज देसाई यांना कपाट, तर सत्यजित पाटणकर यांना ऑटोरिक्षा देण्यात आली. कोरेगावमध्ये सुनील खत्री यांना कपबशी, तर सुनील माने यांना स्कूटर चिन्ह मिळाले.माण मतदारसंघात ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांना फुटबॉल, शेखर गोरे यांना कॅरम बोर्ड, तर मनोज पोळ यांना चष्मा चिन्ह देण्यात आले. खंडाळ्यात अजय भोसले यांना खटारा, शामराव गाढवे यांना चालण्याची काठी, तर संजीव गाढवे यांना मोबाईल चिन्ह मिळाले. फलटणमध्ये समशेर नाईक निंबाळकर यांना हेलिकॉप्टर, तर संजीवराजे नाईक निंबाळकर यांना सुटकेस चिन्ह देण्यात आले. अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गात सत्यवान कांबळे यांना बस, सुरेश गायकवाड यांना टॅक्सी, दीपक चव्हाण यांना छत्री, तर रवींद्र बडेकर यांना लिफाफा चिन्ह मिळाले. इतर मागास प्रवर्गात संदीप पाचांगणे यांना बॅट, तर योगेश फडतरे यांना छत्री देण्यात आली. विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गात अर्जुन काळे यांना बशी, तर सुनील वाघ यांना

भुसावळात 'जगदंबा आई भवानीचा उदो'चा अखंड गजर!

५६ दुर्गा मंडळांचा मुख्य मिरवणुकीत सहभाग; भक्तांचा जल्लोष अन् अबालवृद्धांचा उत्साह

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: दहा दिवसांच्या भक्तिमय वातावरणानंतर 'जगदंबा आई भवानीचा उदो' आणि दुर्गामातेच्या जयघोषात भुसावळ शहरात नवरात्रोत्सवाची उत्साहात सांगता झाली. ढोल-ताशांचा कडकडाट, भक्तांचा जल्लोष आणि भावपूर्ण वातावरणात पार पडलेली दुर्गामातेची विसर्जन मिरवणूक यंदा भक्ती, शिस्त आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरली. प्रशासनाचे नियोजन आणि पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे ही मिरवणूक शांततेत संपन्न झाली.

नृसिंह मंदिरातील महाआरतीने मिरवणुकीचा प्रारंभ सायंकाळी चारच्या सुमारास नृसिंह मंदिराजवळ प्रभारी नगराध्यक्ष शैलेजा नारखेडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर दुर्गामातेच्या विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. यंदा भुसावळ शहरात एकूण २०४ दुर्गा मंडळांची स्थापना झाली होती. त्यापैकी ५६ प्रमुख मंडळे मुख्य विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाली. बुधवारी सायंकाळी सुरू झालेली मिरवणूक गुरुवारी पहाटेपर्यंत सुरू होती. मातेच्या जयघोषाने आणि ढोल-ताशांच्या गजराने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या उत्सवात उत्साहाने सहभाग घेतला. विसर्जनाच्या वेळी अनेक भाविकांनी मातेचे दर्शन घेत भावपूर्ण निरोप दिला.



तापी घाटावर प्रकाशयोजना; वाघूर परिसरात सुरक्षित विसर्जन

विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने तापी नदीच्या घाटावर विशेष व्यवस्था केली होती. घाट परिसरात प्रकाशयोजना, प्रशिक्षित जलतरणपटूंचे पथक आणि आपत्कालीन यंत्रणा तैनात करण्यात आली होती. बहुतांश मंडळांनी तापी नदीपात्रात, तर मोठ्या मूर्तींचे विसर्जन वाघूर धरणाच्या गारखेडा बॅकवॉटर परिसरात करण्यात आले. विसर्जनस्थळी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक व्यवस्था करण्यात आल्याने मिरवणुकीतील गर्दीचे नियोजन करण्यास मदत झाली. वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांच्याकडून दर्शन मशीद चौक परिसरात नगरपालिकेच्या वतीने विशेष व्यासपीठ उभारण्यात आले होते. राज्याचे वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी मिरवणुकीला भेट देऊन दुर्गामातेचे दर्शन घेतले आणि पूजा-अर्चा केली. यावेळी त्यांनी विविध दुर्गा मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची भेट घेतली. त्यांच्या उपस्थितीमुळे मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. रात्री १२ वाजता वाद्ये बंद; मंडळांकडून नियमांचे पालन

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी दिलेल्या सूचनांनुसार रात्री बरोबर १२ वाजता सर्व मंडळांनी डीजे आणि पारंपरिक वाद्ये बंद केली. त्या वेळेपर्यंत सुमारे ३० ते ३५ मंडळे मशीद चौकातून पुढे मार्गस्थ झाली होती. त्यानंतर उर्वरित मंडळांनी वाद्यांशिवाय केवळ दुर्गामातेचा जयघोष करत विसर्जनस्थळाकडे मार्गक्रमण केले. मिरवणुकीदरम्यान शिस्त आणि शांतता राखण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे विविध मंडळांच्या सहभागातून उत्सवाचा उत्साह कायम राहिला आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले. पोलिसांचा तगडा बंदोबस्त; ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे देखरेख

पोलीस उपअधीक्षक केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल वाघ, पोलीस निरीक्षक महेश गायकवाड आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल भंडारे यांनी बंदोबस्ताचे नियोजन केले होते. सुरक्षेसाठी दोन पोलीस उपअधीक्षक, दोन पोलीस निरीक्षक, सहा अधिकारी, १३८ पोलीस अंमलदार, १५८ होमगार्ड आणि राज्य राखीव पोलीस दलाची (एसआरपीएफ) एक तुकडी तैनात करण्यात आली होती. याशिवाय सीसीटीव्ही, फिरते कॅमेरे आणि ड्रोनच्या माध्यमातून संपूर्ण मिरवणूक मार्गावर देखरेख ठेवण्यात आली. रात्रभर स्वच्छता मोहीम; मशीद चौक पहाटेपूर्वी चकाचक

मिरवणुकीदरम्यान मशीद चौक परिसरात साचलेला गुलाल, कचरा आणि फुलांचे अवशेष हटवण्यासाठी नगरपालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांनी तातडीने काम सुरू केले. कर्मचाऱ्यांनी रात्रभर परिश्रम घेत पहाटेपूर्वीच परिसर स्वच्छ केला. या कामावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष लक्ष ठेवले. बसस्थानकाचे कामकाज पूर्ववत

विसर्जन मिरवणुकीतील गर्दी लक्षात घेऊन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बसस्थानकाचे एका दिवसासाठी तात्पुरते स्थलांतर करण्यात आले होते. गुरुवारी सकाळी बसस्थानकाचे कामकाज पुन्हा मूळ जागेवरून सुरू करण्यात आले. शांततेत सांगता; प्रशासनासह नागरिकांकडून समाधान

भुसावळमधील दुर्गा विसर्जन मिरवणूक कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग, पोलिसांचा बंदोबस्त, नगरपालिका प्रशासनाचे नियोजन आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान यामुळे उत्सवाची सांगता सुरळीत झाली. या नियोजनाबद्दल प्रशासनासह शहरवासीयांनी समाधान व्यक्त केले. दहा दिवसांच्या भक्तिमय वातावरणानंतर 'जगदंबा आई भवानीचा उदो' आणि दुर्गामातेच्या जयघोषात भुसावळ शहरात नवरात्रोत्सवाची उत्साहात सांगता झाली. ढोल-ताशांचा कडकडाट, भक्तांचा जल्लोष आणि भावपूर्ण वातावरणात पार पडलेली दुर्गामातेची विसर्जन मिरवणूक यंदा भक्ती, शिस्त आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरली. प्रशासनाचे नियोजन आणि पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे ही मिरवणूक शांततेत संपन्न झाली. नृसिंह मंदिरातील महाआरतीने मिरवणुकीचा प्रारंभ सायंकाळी चारच्या सुमारास नृसिंह मंदिराजवळ प्रभारी नगराध्यक्ष शैलेजा नारखेडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर दुर्गामातेच्या विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. यंदा भुसावळ शहरात एकूण २०४ दुर्गा मंडळांची स्थापना झाली होती. त्यापैकी ५६ प्रमुख मंडळे मुख्य विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाली. बुधवारी सायंकाळी सुरू झालेली मिरवणूक गुरुवारी पहाटेपर्यंत सुरू होती. मातेच्या जयघोषाने आणि ढोल-ताशांच्या गजराने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या उत्सवात उत्साहाने सहभाग घेतला. विसर्जनाच्या वेळी अनेक भाविकांनी मातेचे दर्शन घेत भावपूर्ण निरोप दिला. तापी घाटावर प्रकाशयोजना; वाघूर परिसरात सुरक्षित विसर्जन

विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने तापी नदीच्या घाटावर विशेष व्यवस्था केली होती.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

धुळ्यात बहुजन समाजाचा विजयादशमी मेळावा उत्साहात



जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी : विजयादशमीचे औचित्य साधून धुळे येथे आयोजित बहुजन समाज विजयादशमी मेळावा मंगळवारी (दि. २० ऑक्टोबर) उत्साहात संपन्न झाला. विद्यावर्धिनी महाविद्यालयामागील लुंबिनी वन परिसरातील लुंबिनी बुद्धविहार येथे झालेल्या या मेळाव्यात भगवान गौतम बुद्ध यांची शिकवण, सम्राट अशोक यांचे विचार, भारतीय संविधान आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बौद्ध धम्मविषयक विचारांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी लेखक इंजि. राजदीप आगळे यांच्या २० व्या पुस्तकाचे प्रकाशन हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षणाचा भाग ठरला.

राजदीप आगळे यांच्या २० व्या पुस्तकाचे प्रकाशन मेळाव्याचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल कॉलेज ऑफ लॉ, धुळेचे चेअरमन इंजि. महेंद्र निळे यांच्या हस्ते झाले. लेखक इंजि. राजदीप आगळे यांनी प्रास्ताविकातून मेळाव्याची भूमिका आणि आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. यावेळी राजदीप आगळे लिखित 'संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बौद्ध धर्मावरील भाषणे' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. आगळे यांच्या साहित्यिक प्रवासातील हे २० वे पुस्तक असल्याने उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत केले. बुद्ध, सम्राट अशोक आणि संविधानाच्या विचारांवर मार्गदर्शन मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आदिवासी विकास विभागाचे निवृत्त परिवहन आयुक्त तथा प्रधान सचिव भाईदास ई. नगराळे होते. चौगाव कॉलेजचे प्राचार्य राजेंद्र बोराळकर आणि संथागार प्रतिष्ठान, धुळेचे प्रा. विलास चव्हाण यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. भगवान गौतम बुद्ध यांनी दिलेली सत्य, अहिंसा, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि शांततेची शिकवण समाजजीवनात रुजविण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. भारतीय संविधानातील समता आणि न्यायाची मूल्ये तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माच्या माध्यमातून मांडलेले सामाजिक परिवर्तनाचे विचार यांवरही चर्चा झाली. सम्राट अशोक यांनी कलिंग युद्धानंतर बौद्ध धम्माचा स्वीकार करून शांतता आणि धम्मविचारांच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न, तसेच शिलालेखांच्या माध्यमातून जनतेपर्यंत विचार पोहोचविण्याची परंपरा, यांचा संदर्भही मेळाव्यात मांडण्यात आला. सामाजिक आणि बौद्ध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला नेर कॉलेजचे प्राचार्य सुरेंद्र मोरे, समता सैनिक दलाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र गुमान अहिरे, बौद्धाचार्य मनोहर निकम, भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष प्रा. बी. टी. अहिरे, भारतीय बौद्ध महासभेचे विभागीय अध्यक्ष सुरेश आण्णा लोंढे, जिल्हाध्यक्ष महेंद्र आण्णा महाले आणि बौद्धाचार्य रत्नशील सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कासारखेडे क्रिकेट स्पर्धेत 'बेस्ट ११ किनगाव'चा विजयी षटकार!

१६ संघांचा सहभाग; अंतिम सामन्यात आझाद क्रिकेट क्लब

जन सम्राट टाईम्स

यावल। प्रतिनिधी : कासारखेडे (ता. यावल) येथे आयोजित पंचक्रोशीस्तरीय भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा थरार २२ ऑक्टोबर रोजी उत्साहात संपन्न झाला. चुरशीच्या अंतिम सामन्यात 'बेस्ट ११ किनगाव' संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद आणि KPL मानाची ट्रॉफी पटकावली. या विजयामुळे किनगावच्या संघाने स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. १६ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या क्रिकेट महोत्सवात यावल पंचक्रोशीतील १६ संघांनी सहभाग घेतला.

सहा दिवस चाललेल्या स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट फलंदाजी, गोलंदाजी आणि सांघिक खेळाचे प्रदर्शन केले. प्रत्येक सामन्यात क्रिकेटप्रेमींचा उत्साह दिसून आला. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या प्रेक्षकांनी खेळाडूंना प्रोत्साहन देत स्पर्धेची रंगत वाढवली. विजेत्यांवर पारितोषिकांचा वर्षाव



२२ ऑक्टोबर रोजी झालेल्या अंतिम सामन्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण सोहळा पार पडला. प्रथम क्रमांक – बेस्ट ११ किनगाव: विजेतेपदाची भव्य ट्रॉफी आणि ११,१११ रुपये रोख. पारितोषिकाचे देणगीदार कु. पवन दिगंबर पाटील. द्वितीय क्रमांक – आझाद क्रिकेट क्लब, कासारखेडे: उपविजेतेपदाची ट्रॉफी आणि ५,५५५ रुपये रोख. पारितोषिकाचे देणगीदार श्री. रामप्रसाद पोपट पाटील. क्रीडावृत्ती आणि सांघिक भावनेचे दर्शन या स्पर्धेमुळे पंचक्रोशीतील नवोदित तसेच अनुभवी खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, संयम आणि सांघिक भावना यामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्रीडाप्रेम वाढविण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरत असल्याची भावना क्रिकेटप्रेमींनी व्यक्त केली. कालू, जुनेद आणि साहिल तडवी यांचे नियोजन स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी कालू तडवी, जुनेद तडवी आणि साहिल तडवी यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनामुळे स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी आणि तरुणांच्या मोठ्या सहभागामुळे कासारखेडे येथील हा क्रिकेट महोत्सव संस्मरणीय ठरला.

सहा महिन्यांत कोट्यवधींच्या रस्त्याला तडे; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी उपोषण!

जन सम्राट टाईम्स

धुळे । (प्रतिनिधी): शिरपूर तालुक्यातील आढे, थाळनेर, मांजरोद, घोडसगाव आणि बभळाज या गावांना जोडणाऱ्या सुमारे ३२ किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याला अवघ्या सहा महिन्यांत तडे गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीच्या वापराबाबत चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते गणेश वामनराव वाडीले आणि छाया रमेश पाटील यांनी धुळे येथील क्यूमाईन क्लब येथे उपोषण सुरू केले आहे.

या रस्त्याच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रशासनाने दखल घेतली नाही, तर मंत्रालयात जाऊन आंदोलन छेडण्याचा इशाराही वाडीले आणि पाटील यांनी दिला आहे.



१८० कोटींच्या निधीच्या वापरावर प्रश्नचिन्ह

आंदोलकांनी दिलेल्या माहितीनुसार, आढे, थाळनेर, मांजरोद, घोडसगाव आणि बभळाज या गावांदरम्यानच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी शासनाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला १८० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला होता. मात्र, रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत त्याला तडे गेल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. मोठ्या निधीतून उभारण्यात आलेल्या रस्त्याची अल्पावधीतच दुरवस्था होत असेल, तर कामाच्या गुणवत्तेची तपासणी होणे आवश्यक असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची तांत्रिक तपासणी करून रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य, बांधकामाचा दर्जा आणि कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची भूमिका यांची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दोषींवर कारवाईची मागणी; मंत्रालयात आंदोलनाचा इशारा

शासनाच्या निधीचा योग्य विनियोग झाला आहे की नाही, याची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी गणेश वामनराव वाडीले आणि छाया रमेश पाटील यांनी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास मंत्रालयात जाऊन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. या उपोषणावेळी गणेश वामनराव वाडीले, छाया रमेश पाटील, संदीप जमादार आदी उपस्थित होते. दरम्यान, रस्त्याला तडे जाण्याची नेमकी कारणे निश्चित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची अधिकृत भूमिका, तांत्रिक तपासणीचा अहवाल आणि संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे समोर येणे आवश्यक आहे.

पहिल्या विवाहाची माहिती लपवून फसवणूक केल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

बोदवड। प्रतिनिधी: विवाहापूर्वी पहिल्या लग्नाची माहिती लपवून वराची आणि त्याच्या कुटुंबीयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात बोदवड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे. वधूसह विवाह जुळवून देणाऱ्या मध्यस्थांविरुद्ध एफआयआर (FIR) नोंदवून सखोल तपास करण्याचे निर्देश न्यायालयाने पोलिसांना दिले आहेत. हा आदेश १९ ऑक्टोबर २०२६ रोजी देण्यात आला. विवाह जुळवण्यासाठी अडीच लाख रुपये दिल्याचा दावा न्यायालयात दाखल अर्जानुसार, फिर्यादी पंकज पाटील यांचा विवाह ३१ मे २०२४ रोजी बोदवड येथील बळीराजा मंगल कार्यालयात पारंपरिक पद्धतीने झाला होता. हा विवाह जुळवून देण्यासाठी आरोपी क्रमांक ४ ते ६ असलेल्या मध्यस्थांना अडीच लाख रुपये दिल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. तसेच, बैठकीत ठरल्याप्रमाणे वधूच्या अंगावरील दागिने आणि विवाहाचा संपूर्ण



खर्चही स्वतःला व कुटुंबीयांना करावा लागल्याचे फिर्यादीचे म्हणणे आहे. आधार कार्डावरील नावावरून पहिल्या विवाहाची माहिती समोर आल्याचा आरोप विवाहानंतर पत्नीच्या आधार कार्डावर 'अश्विनी भूषण पाटील' असे नाव असल्याचे फिर्यादीच्या निदर्शनास आले. हे नाव तिच्या पहिल्या पतीशी संबंधित असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर अधिक चौकशी केली असता पत्नीचा यापूर्वी विवाह झाल्याची माहिती समोर आल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. पहिल्या विवाहाची माहिती लग्नापूर्वी जाणीवपूर्वक लपवून आपली आणि आपल्या कुटुंबीयांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप पंकज पाटील यांनी न्यायालयात केला. हे प्रकरण पंकज पाटील विरुद्ध अश्विनी पाटील व इतर या स्वरूपात न्यायालयासमोर आले. BNSS कलम १७५(३) अन्वये तपासाचे निर्देश फिर्यादीची तक्रार आणि सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन न्यायालयाने प्रथमदर्शनी दखलपात्र गुन्हा घडला असण्याची शक्यता व्यक्त केली. विवाहापूर्वीची माहिती लपविल्याचा आणि पैशांची देवाणघेवाण झाल्याचा आरोप असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यानुसार, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम १७५(३) अन्वये संबंधित पोलीस ठाण्याला एफआयआर नोंदवून तपास करण्याचे आणि त्यानंतर अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

केळी पीक विम्याच्या जाचक अटी बदलण्याची मागणी

CSC केंद्रचालकांची बैठक सेतू केंद्रचालकांना अधिकृत ओळखपत्र देण्याबाबत आश्वासन

जन सम्राट टाईम्स

फैजपूर । प्रतिनिधी: विम्याचे अर्ज भरताना CSC (महा-ई-सेवा) केंद्रचालकांना येणाऱ्या विविध अडचणी आणि शासन निर्णयातील जाचक अटींमध्ये बदल करण्याच्या मागणीसाठी फैजपूर येथे रावेर तालुक्यातील CSC व सेतू केंद्रचालकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रांताधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पीक विमा अर्ज प्रक्रियेतील अडचणी, केंद्रचालकांवरील जबाबदाऱ्या आणि शासन निर्णयातील तरतुदींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अखिलस्तरीय महा-ई-सेवा केंद्र व आधार केंद्र संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या रावेर तालुका कार्यकारिणीने ९ सप्टेंबर २०२६ रोजी तहसील कार्यालय आणि तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन दिले होते. या निवेदनातून शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक १० आणि ११ मधील तरतुदींवर आक्षेप नोंदवत त्यात बदल करण्याची मागणी करण्यात आली होती. शेतात जाऊन पडताळणीच्या अटींना आक्षेप

केळी पीक विम्याचे अर्ज भरताना CSC केंद्रचालकांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन केळी लागवडीची पडताळणी करणे, तसेच सामायिक क्षेत्रासंदर्भातील घोषणापत्र आणि भाडेकराराची पडताळणी करणे, अशा अटींमुळे व्यावहारिक अडचणी निर्माण होत असल्याचे केंद्रचालकांनी बैठकीत



मांडले. या अटींचा फेरविचार करून केंद्रचालकांना येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी संघटनेने केली. तसेच केळी पीक विम्याचे अर्ज अचूक व नियमानुसार भरता यावेत, यासाठी तालुका कृषी कार्यालयामार्फत सर्व CSC केंद्रचालकांना अधिकृत प्रशिक्षण देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली. ललित सोनार यांनी मांडल्या केंद्रचालकांच्या समस्या बैठकीत संघटनेच्या वतीने ललित सोनार यांनी केंद्रचालकांच्या व्यावहारिक अडचणी, कामाचे स्वरूप आणि त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांबाबत प्रशासनाचे लक्ष वेधले. पीक विमा अर्ज प्रक्रियेत केंद्रचालकांना येणाऱ्या अडचणींचा विचार करून शासन निर्णयातील संबंधित तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. ओळखपत्र देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद सेतू केंद्रचालकांना प्रशासनाकडून अधिकृत ओळखपत्र (आयडी कार्ड) देण्यात यावे, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली. यावर प्रांताधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित तहसील कार्यालयाला आवश्यक सूचना देण्यात येतील, असे आश्वासन दिले. पीक विमा प्रक्रियेतील अडचणी आणि इतर मागण्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासनही प्रांताधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती संघटनेच्या सदस्यांनी दिली. बैठकीला केंद्रचालकांची उपस्थिती या बैठकीला रावेर तालुक्यातील CSC व सेतू केंद्रचालक संघटनेचे ललित सोनार, जयवंत चौधरी, सूर्यकांत पाटील, किरण सावळे, महेंद्र कोळी, निलेश नेमाडे, ऋषिकेश महाजन, किरण नेमाडे, प्रवीण तायडे आणि विलास ताठे यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते. केंद्रचालकांच्या समस्या समजून घेतल्याबद्दल उपस्थितांनी प्रांताधिकाऱ्यांचे आभार मानले. आता शासन निर्णयातील तरतुदींमध्ये बदल होणार का, पीक विमा अर्जांसाठी अधिकृत प्रशिक्षण मिळणार का आणि सेतू केंद्रचालकांना ओळखपत्रे कधी मिळणार, याकडे रावेर तालुक्यातील केंद्रचालकांचे लक्ष लागले आहे.

दिवाळी-छठपूजेमुळे Pune Railway स्थानकावर गर्दीचा महापूर!

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: दिवाळीच्या सुट्यांमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांची वाढणारी संख्या आणि त्यापाठोपाठ येणारा उत्तर भारतीयांचा छठपूजा सण यामुळे पुणे रेल्वे स्थानकावर पुढील महिनाभर मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रवाशांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने विशेष उपाययोजना केल्या आहेत. स्थानकावर फलाटांवर होणारी गर्दी कमी करण्यासाठी 'होल्डिंग झोन' तयार करण्यात आला असून, ज्या प्रवाशांचे रेल्वे तिकीट निश्चित (कन्फर्म) आहे, अनारक्षित तिकीट असलेल्या प्रवाशांना तसेच गाडीची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांना होल्डिंग झोनमध्ये थांबण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. गर्दीमुळे चेंगराचेंगरीसारख्या दुर्घटना घडू नयेत, यासाठी रेल्वे प्रशासनाकडून खबरदारी घेतली जात आहे. दिवाळीच्या काळात पुणे रेल्वे स्थानकावरून उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालकडे जाणाऱ्या गाड्यांना मोठ्या प्रमाणात गर्दी असते. यंदा दिवाळीनंतर छठपूजा असल्याने परराज्यांत जाणाऱ्या प्रवाशांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानकावरील गर्दीचे नियोजन करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने आतापासूनच तयारी सुरू केली आहे. गाडी पकडण्यासाठी फलाटावर जाणारे आणि गाडीतून उतरणारे प्रवासी एकाच वेळी एकत्र आल्यास गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. अशा वेळी प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये, यासाठी फलाटावरील गर्दी नियंत्रित करण्यावर भर देण्यात येणार आहे. व्हीआयपी कक्षाशेजारी होल्डिंग झोन तयार करण्यात आला आहे. या ठिकाणी प्रवाशांना थांबण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पिण्याच्या पाण्याची आणि स्वच्छतागृहाची सुविधाही करण्यात आली आहे.

धडगावमध्ये तातडीने एमएसपी हमीभाव खरेदी केंद्र सुरू करा!

खासगी दुकानांतील नियमबाह्य खरेदी आणि वजन-मापातील कथित गैरप्रकारांवर कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

धडगावा प्रतिनिधी: धडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य भाव मिळावा, यासाठी तातडीने शासकीय किमान आधारभूत किंमत (MSP) खरेदी केंद्र सुरू करावे, तसेच खासगी दुकानांमधील कथित नियमबाह्य खरेदी आणि वजन-मापातील गैरप्रकारांना आळा घालावा, अशी मागणी युवा क्रांती सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेने सहायक निबंधक, सहकारी संस्था, धडगाव यांना निवेदन दिले आहे. प्रशासनाने सात दिवसांत ठोस पावले उचलली नाहीत, तर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन, तीव्र जनआंदोलन आणि रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. हमीभाव केंद्राअभावी शेतकऱ्यांची अडचण मका, ज्वारी, बाजरी, तूर आणि सोयाबीन या पिकांसाठी शासनाकडून किमान आधारभूत किमती जाहीर केल्या जातात. मात्र, धडगावसारख्या दुर्गम आणि आदिवासीबहुल तालुक्यात अधिकृत शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. शेतमाल बाजारात विक्रीसाठी येत असताना योग्य बाजारपेठ आणि हमीभावाने खरेदीची सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडे कमी दराने माल विकावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी संबंधित पिकांसाठी तातडीने शासकीय खरेदी केंद्र सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. खासगी खरेदी आणि वजन-मापाबाबत गंभीर आरोप धडगाव परिसरातील काही व्यापारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिकृत आवाराबाहेर खासगी दुकाने किंवा गोदामांमध्ये शेतमालाची



खरेदी-विक्री करत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) कायदा, १९६३ मधील लागू तरतुदींनुसार व्यवहारांची तपासणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. खासगी दुकानांमध्ये प्रमाणित इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांचा वापर होत नसल्याने वजनात फेरफार होण्याची शक्यता आहे. तसेच शेतकऱ्यांना वजनाची अधिकृत पावती किंवा चुकारा पावती दिली जात नसल्याचे आणि दरपत्रक प्रदर्शित न करता मनमानी दराने खरेदी होत असल्याचे आरोपही निवेदनातून करण्यात आले आहेत. या आरोपांची निष्पक्ष तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी संघटनेची मागणी आहे. संघटनेच्या प्रमुख मागण्या युवा क्रांती सामाजिक संघटनेने प्रशासनाकडे पुढील मागण्या केल्या आहेत : शासकीय हमीभाव केंद्र: मका, ज्वारी, बाजरी, तूर आणि सोयाबीनसाठी तातडीने अधिकृत MSP खरेदी केंद्र सुरू करावे. खरेदी व्यवहारांची तपासणी: खासगी दुकानांमधील खरेदी-विक्रीची कायद्यानुसार तपासणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास कारवाई करावी. पारदर्शक वजन-माप व्यवस्था: बाजार आवारात प्रमाणित डिजिटल वजनकाटे, दरपत्रक फलक आणि संगणकीय पावती प्रणाली उपलब्ध करून द्यावी. संयुक्त तपासणी पथक: महसूल, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक स्थापन करून खासगी दुकानांची अचानक तपासणी करावी. दोषींवर कायदेशीर कारवाई: तपासणीत अनियमितता सिद्ध झाल्यास संबंधित व्यापाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी. सात दिवसांत कारवाई करा; अन्यथा आंदोलन युवा क्रांती सामाजिक संघटनेचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण आर. पाडवी यांनी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे. "धडगाव तालुक्यातील गरीब व आदिवासी शेतकऱ्यांच्या घामाचे योग्य मोल मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. प्रशासनाने सात दिवसांत ठोस व सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर समस्त शेतकरी बांधवांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल. यामुळे निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी स्थानिक प्रशासनाची राहील," असा इशारा लक्ष्मण आर. पाडवी यांनी दिला. पदाधिकारी आणि शेतकरी उपस्थित सहायक निबंधकांना निवेदन देताना युवा क्रांती सामाजिक संघटनेचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण आर. पाडवी, जिल्हा संपर्कप्रमुख शामू पराडके, प्रदेश संघटक मंगेश वळवी, तालुका संघटक रवींद्र वळवी, धडगाव शहरप्रमुख सुनील पावरा यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि शेतकरी बांधव उपस्थित होते. शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ मिळावा, वजन-मापातील संभाव्य गैरप्रकार थांबावेत आणि कृषी बाजारातील व्यवहार पारदर्शक व्हावेत, धडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य भाव मिळावा, यासाठी तातडीने शासकीय किमान आधारभूत किंमत (MSP) खरेदी केंद्र सुरू करावे, तसेच खासगी दुकानांमधील कथित नियमबाह्य खरेदी आणि वजन-मापातील गैरप्रकारांना आळा घालावा, अशी मागणी युवा क्रांती सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेने सहायक निबंधक, सहकारी संस्था, धडगाव यांना निवेदन दिले आहे. प्रशासनाने सात दिवसांत ठोस पावले उचलली नाहीत, तर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन, तीव्र जनआंदोलन आणि रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. हमीभाव केंद्राअभावी शेतकऱ्यांची अडचण मका, ज्वारी, बाजरी, तूर आणि सोयाबीन या पिकांसाठी शासनाकडून किमान आधारभूत किमती जाहीर केल्या जातात. मात्र, धडगावसारख्या दुर्गम आणि आदिवासीबहुल तालुक्यात अधिकृत शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

धुळ्यात 'वेंकटरमना गोविंदा'च्या जयघोषात बालाजी रथ मार्गस्थ!



जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी :: भगवान की जय' अशा जयघोषाने धुळे शहरातील वातावरण भक्तिमय झाले असून, १४७ वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेला भगवान बालाजीचा रथ नगरप्रदक्षिणेसाठी मार्गस्थ झाला आहे. दसऱ्याच्या तिसऱ्या दिवशी निघणाऱ्या या रथोत्सवात हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. यंदा धुळे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रावरील दुष्काळाचे संकट दूर व्हावे, अशी प्रार्थना भाविकांनी भगवान बालाजीच्या चरणी केली. मंदिरातील भगवान बालाजीची मूर्ती रथावर विराजमान करण्यात आल्यानंतर विधिवत पूजन आणि महाआरती करून रथोत्सवाला सुरुवात झाली. कैलास अग्रवाल आणि संदीप अग्रवाल यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. सकाळी ११ वाजल्यापासून सुरू झालेल्या रथयात्रेचे शहरातील विविध भागांत जल्लोषात स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी आरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याने संपूर्ण शहरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. हमाल कामगारांना रथ ओढण्याचा मान धुळे शहराच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या बालाजी रथोत्सवाला दीड शतकाहून अधिक काळाचा इतिहास आहे. गेल्या १४७ वर्षांपासून भगवान बालाजीचा रथ ओढण्याचा मान धुळ्यातील हमाल कामगारांना मिळत आला आहे. ही परंपरा आजही श्रद्धेने जपली जात आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात नऊ दिवस भगवान बालाजी विविध रूपांत शहरभ्रमंती करतात. त्यानंतर दसऱ्याच्या तिसऱ्या दिवशी भगवान बालाजी रथावर विराजमान होऊन नगरप्रदक्षिणेसाठी निघतात. या परंपरेचे पालन यंदाही करण्यात आले. रथाच्या मार्गावर भाविकांची गर्दी बालाजी मंदिरातून निघालेला रथ रथ गल्ली, खोल गल्ली, गल्ली क्रमांक चार, राजकमल टॉकीज, पाच कंदील, आग्रा रोड, कराचीवाला खुंट, गांधी पुतळा, नगरपट्टी, गल्ली क्रमांक सहा आणि भगवा चौक मार्गे पुन्हा बालाजी मंदिरात पोहोचणार आहे. रथाच्या दर्शनासाठी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. रथाचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. भाविकांनी भगवान बालाजीचे दर्शन घेत कुटुंबाच्या सुख-समृद्धीसह पावसाचे संकट दूर होऊन शेतकरी आणि सर्वसामान्यांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना केली.

जगवानी नगरच्या रहिवाशांसाठी उद्योजक राजेंद्र पाटील यांचा पुढाकार

मुख्य प्रवेशद्वाराला 'सुमेर सिंग' नाव देण्याचा मानस

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : जळगाव एमआयडीसी परिसरातील जगवानी नगर येथील रहिवाशांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला येण्या-जाण्याच्या रस्त्याचा प्रश्न आता मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उद्योजक तथा मन्यारखेडा गावचे माजी सरपंच राजेंद्र भगवान पाटील (राजुभाऊ) यांनी यासाठी पुढाकार घेत स्वतःच्या मालकीच्या प्लॉटमधून रस्ता उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. राजेंद्र पाटील यांनी एमआयडीसी परिसरातील संबंधित प्लॉट सर्वाधिक बोली लावून विकत घेतला आहे. या प्लॉटमधून जगवानी नगरमधील रहिवाशांना येण्या-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याचा निर्णय त्यांनी घेतल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या मार्गाच्या मुख्य प्रवेशद्वाराला 'सुमेर सिंग' असे नाव देण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला आहे. सामाजिक बांधिलकीचे उदाहरण स्वतःच्या मालकीच्या जागेचा उपयोग



नागरिकांच्या सोयीसाठी करण्याच्या या निर्णयाचे जगवानी नगर परिसरात स्वागत होत आहे. संपत्तीचा उपयोग केवळ वैयक्तिक हितासाठी न करता समाजाच्या गरजांसाठीही करता येतो, ही भावना या निर्णयातून व्यक्त होत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. "खरी श्रीमंती संपत्तीत नसून समाजासाठी केलेल्या कार्यात असते," अशी भावना यानिमित्ताने व्यक्त करण्यात आली. रहिवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. रहिवाशांकडून आभार व कृतज्ञता रस्त्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल जगवानी नगरमधील रहिवासी आणि ज्येष्ठ नागरिकांनी राजेंद्र भगवान पाटील यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. विनीत मनोज सुरवाडे आणि समस्त जगवानी नगर रहिवासी परिवाराच्या वतीने राजेंद्र पाटील यांचे आभार मानण्यात आले. "राजुभाऊ, आपल्या स्तुत्य निर्णयाला सलाम! धन्यवाद राजुभाऊ!" अशा शब्दांत रहिवाशांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या रस्त्याच्या प्रश्नावर तोडगा निघण्याची आशा निर्माण झाल्याने जगवानी नगरमधील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. जळगाव एमआयडीसी परिसरातील जगवानी नगर येथील रहिवाशांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला येण्या-जाण्याच्या रस्त्याचा प्रश्न आता मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राजेंद्र भगवान पाटील (राजुभाऊ) यांनी यासाठी पुढाकार घेत स्वतःच्या मालकीच्या प्लॉटमधून रस्ता उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रा. वसंत हंकारे यांचे 'न समजलेले माय-बाप' विषयावर हृदयस्पर्शी व्याख्यान

जन सम्राट टाईम्स



शिंदखेडा। (प्रतिनिधी): विद्यार्थ्यांमध्ये आई-वडिलांविषयी कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी, तसेच वाचनाची आवड, सामान्य ज्ञान आणि स्पर्धात्मक वृत्ती वाढीस लागावी, या उद्देशाने सत्यशोधक युवा मंच, शिंदखेडा यांच्या वतीने आयोजित व्याख्यान व सामान्य ज्ञान परीक्षा हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी बिजासनी मंगल कार्यालय येथे झालेल्या या कार्यक्रमाला सुमारे तीन हजार विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमात प्रा. वसंत हंकारे यांनी 'न समजलेले माय-बाप' या विषयावर प्रभावी व हृदयस्पर्शी व्याख्यान दिले. आई-वडिलांचे कष्ट, त्याग, संस्कार आणि मुलांच्या जीवनातील त्यांचे अनमोल स्थान यावर त्यांनी मार्मिक विवेचन केले. पालक आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी आयुष्यभर घेत असलेले कष्ट आणि मुलांनी त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. त्यांच्या व्याख्यानाला उपस्थित विद्यार्थी, युवक-युवती आणि पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामान्य ज्ञान परीक्षेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या कार्यक्रमाच्या निमित्ताने १७ ऑक्टोबर रोजी शिंदखेडा शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची जिज्ञासा, वाचनसंस्कृती आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची वृत्ती विकसित व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे : लहान गट (वयोगट ८ ते १० वर्षे)प्रथम क्रमांक: लक्ष्मी रवींद्र निकम — मीराबाई गर्ल्स हायस्कूल, शिंदखेडा द्वितीय क्रमांक: दिव्यांनी शिवाजी कोळी — नूतन माध्यमिक विद्यालय, धमाणेतृतीय क्रमांक: जित जितेंद्र जाधव — स्वामी समर्थ हायस्कूल, शिंदखेडा मोठा गट (वयोगट ११ ते १२ वर्षे) प्रथम क्रमांक: हर्षली हिम्मत जाधव — जनता हायस्कूल, शिंदखेडा द्वितीय क्रमांक: देवेंद्रसिंग केवळसिंग गिरासे — एम.एच. एस.एस. ज्युनिअर कॉलेज तृतीय क्रमांक: ऋषिकेश मोहनसिंग गिरासे — एन. डी. मराठे विद्यालय, शिंदखेडा महापुरुषांना अभिवादन; विद्यार्थ्यांना भेटवस्तूंचे वाटप कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर तसेच देशासाठी बलिदान देणाऱ्या सर्व महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.

बदलापुरात धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला

जन सम्राट टाईम्स

बदलापूर। प्रतिनिधी: रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.पी.आय. – आर.के.) आणि बुद्धिस्ट मिशन यांच्या संयुक्त सहयोगाने २० ऑक्टोबर २०२६ रोजी बदलापूर पश्चिम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान स्मारकात धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण, पंचशील आणि बुद्धवंदना घेण्यात आली. कार्यक्रमात खीरदान आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'धर्मांतरानंतरची स्थित्यंतरे' विषयावर विचारमंथन दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानाचा विषय 'धर्मांतरानंतरची स्थित्यंतरे' असा होता. या विषयावर प्रमुख व्याख्याते श्यामराव सोमकुंवर, प्रा. अनिल भालेराव आणि प्राचार्य संदिपान नवगिरे यांनी आपापले विचार मांडले. धर्मांतरानंतर समाजजीवनात झालेले बदल, वैचारिक जागृती आणि सामाजिक



परिवर्तन यांसारख्या मुद्द्यांवर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला राजाराम खरात, अशोक गजरमल, विनायक अढांगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि धम्माच्या मूल्यांचे जतन करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवर आणि महिला प्रतिनिधींची उपस्थिती या कार्यक्रमाला विनायक अढांगळे, गौतम बचुटे, सुनील दुपटे, अरविंद कदम, मिलिंद सकपाळ, प्रसेनजीत सोनवणे, बाळासाहेब पगारे, नारायण भोसले, नारायण अभंग, पांडुरंग वाव्हळ यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. महिला प्रतिनिधींमध्ये विमलताई पराग, सुशीलाताई खंडागळे, पौर्णिमा गणवीर, कमलताई गजरमल, विद्याताई कसबे, कवितााई दुपटे, सावित्रीबाई गाडे, सुमित्राताई सरतापे, दीपिकाताई शिर्के आणि शशिकलाताई वाव्हळ यांचा समावेश होता. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजाराम खरात यांनी केले, तर सूत्रसंचालन स्वप्निल (भाऊ) शिर्के यांनी केले. राजाराम खरात आणि प्रसेनजीत सोनवणे यांनी आभार मानले. खीरदानानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व अधोरेखित करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

रेल्वे प्रवाशांच्या समस्यांना वाली कोण?

गाड्यांच्या नियोजनावरून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह!

जन सम्राट टाईम्स

मलकापूर । प्रतिनिधी: रेल्वे प्रवाशांच्या समस्या सुटणार तरी कधी? गाड्यांच्या परिचालन नियोजनाबाबत प्रवाशांकडून व्यक्त होणारी नाराजी आणि प्रवासादरम्यान भेडसावणाऱ्या विविध अडचणींमुळे रेल्वे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी, कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे हा प्रवासाचा महत्त्वाचा पर्याय आहे. मात्र, गाड्यांच्या नियोजनामुळे वेळेचा अपव्यय होत असल्याच्या तक्रारींमुळे प्रवाशांना दिलासा देणार कोण, असा सवाल उपस्थित केला जात आहे. गाड्यांच्या नियोजनात समन्वय आहे का? रेल्वे गाड्यांचे परिचालन करताना कोणत्या गाडीला प्राधान्य द्यायचे, कोणत्या गाडीला थांबवायचे आणि कोणत्या गाडीला पुढे मार्ग द्यायचा, याचे नियोजन रेल्वे वाहतुकीची परिस्थिती, सुरक्षितता आणि वेळापत्रक लक्षात घेऊन केले जाते. मात्र, काही वेळा आधी आलेली किंवा आधी निघालेली गाडी थांबवून मागून येणाऱ्या गाडीला पुढे मार्ग दिला जात असल्याचा प्रवाशांचा आक्षेप आहे. अशा निर्णयांमागील कारणे काय असतात, संबंधित गाड्यांच्या वेळापत्रकावर त्याचा किती परिणाम होतो आणि प्रवाशांना होणारा विलंब टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात, याबाबत स्पष्टता असावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. रेल्वे परिचालनातील निर्णय हे तांत्रिक



आणि सुरक्षिततेशी संबंधित निकषांवर घेतले जात असले, तरी त्याचा प्रवाशांच्या प्रवासावर होणारा परिणामही लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे गाड्यांच्या विलंबाची कारणे आणि नियोजनाची पद्धत याबाबत प्रवाशांना योग्य माहिती मिळणे महत्त्वाचे ठरते. प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण कधी? रेल्वेने प्रवाशांना सुरक्षित, सुरळीत आणि वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. मात्र, गाड्यांच्या वेळापत्रकातील विलंब, परिचालनातील अडचणी आणि त्याबाबत माहिती मिळण्यात होणारी गैरसोय यांसारख्या मुद्द्यांवर प्रवाशांच्या तक्रारींची प्रभावी दखल घेणे गरजेचे आहे. प्रवाशांच्या समस्या केवळ आश्वासनांपुरत्या मर्यादित न राहता त्यावर ठोस उपाययोजना होणे आवश्यक आहे. गाड्यांच्या वेळापत्रकाचे पालन, विलंबाची माहिती वेळेत देणे आणि तक्रारींचे त्वरित निराकरण करणे याबाबत रेल्वे प्रशासनाने अधिक दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी प्रवाशांच्या अडचणींची संबंधित वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी दखल घेऊन परिचालन नियोजनाचा आढावा घ्यावा. गाड्यांना प्राधान्य देण्याची पद्धत, विलंबाची कारणे आणि प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण यांची तपासणी करून आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी पुढे येत आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या तक्रारींना गांभीर्याने घेत जबाबदारी निश्चित करावी आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी ठोस पावले उचलावीत. रेल्वे प्रवास हा सर्वसामान्यांसाठी सोयीचा आणि विश्वासार्ह पर्याय राहण्यासाठी प्रवाशांच्या वेळेचा व सुविधांचा विचार होणे आवश्यक आहे. प्रश्न कायम: गाड्यांच्या नियोजनाबाबत प्रवाशांकडून उपस्थित होणाऱ्या आक्षेपांची रेल्वे प्रशासन दखल घेऊन त्यांना दिलासा देणार का? याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे. रेल्वे प्रवाशांच्या समस्या सुटणार तरी कधी? गाड्यांच्या परिचालन नियोजनाबाबत प्रवाशांकडून व्यक्त होणारी नाराजी आणि प्रवासादरम्यान भेडसावणाऱ्या विविध अडचणींमुळे रेल्वे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी, कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे हा प्रवासाचा महत्त्वाचा पर्याय आहे.

सुभाष बाजीराव तायडे यांची नायब तहसीलदारपदी पदोन्नती



जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: जळगाव तालुका तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना विभागात अव्वल कारकून म्हणून कार्यरत असलेले आदरणीय सुभाष बाजीराव तायडे यांची जिल्हा महसूल कार्यालयात नायब तहसीलदारपदी पदोन्नती झाली आहे. या पदोन्नतीनिमित्त त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुभाष तायडे यांच्या पदोन्नतीनिमित्त आयोजित सत्कारप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे माजी पूर्व जिल्हाध्यक्ष आदरणीय शैलेंद्रजी जाधव, माजी तालुकाध्यक्ष आदरणीय जगदीशभाऊ सपकाळे, आदरणीय आ. बा. सपकाळे गुरुजी, आदरणीय रविंद्र बिराडे आणि आदरणीय पवनभाऊ तायडे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन तायडे यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या पदोन्नतीबद्दल आनंद व्यक्त करत उपस्थितांनी त्यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या.